**नि.फौ.के. नं. ८५/२०२३**
**महाराष्ट्र शासन वि.प्रथमेश सोगम व इतर**
**निशाण क्र. ४०**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ चा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – अशोक तानाजी बने,

**वय –** ५२ वर्षे, **व्यवसाय** – शेती,

**राहणार –** तुळसणी, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता कु. एस. आर. वनकर यांचेकडून</u> –**

**०१.** दिनांक ०४/०८/२०२३ रोजी पोलीसांनी मला देवरुख पोलीस ठाणे येथे बोलावले होते. आमच्या गावातील मंदीरामधील घंटा चोरीला गेली होती. त्यामध्ये आरोपींची मुलाखात घेण्यासाठी पोलीसांनी मला बोलावले होते.

**०२.** त्यातील चोरांनी दाखविल्यानुसार पोलीस नागोबा देवस्थानाजवळ मला घेवुन गेले होते. आरोपींची नावे मी विसरलो आहे. पोलीस ठाण्यात माझ्यासोबत सचिन लाड हजर होते. तेथे चोरांनी चोरी केल्याचे सांगून त्यांनी दाखविल्यानुसार पोलीस आम्हाला गाडीतून घेवुन गेले. चोरांनी सांगितल्यानुसार तुळसणीपासून ०३ किलोमीटर येथील नागोबा मंदीराच्या ठिकाणी पोलीस आम्हाला घेवुन गेले. तेथून घंटा चोरल्याचे चोरांनी आम्हाला सांगीतले. सदर ठिकाणी असलेल्या शेडमधून घंटा चोरल्याचे महिला चोराने आम्हाला तेथे सांगितले.

**०३.** पोलीसांनी तेथे जाब–जबानी नोंदविले. त्यानंतर गाडीतून आम्ही सर्व बसून देवरुख येथे आलो. सदरची चोरी एक महिला व तिचा पती या दोघांनी केली. त्यांची नावे मला आठवत नाहीत. पोलीसांनी तेथे माझी व सचिन लाड यांची सही घेतली. (साक्षीदारास निवेदन पंचनामा दाखविला). त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. (सदर **<u>निवेदन पंचनाम्यास निशाणी ४१</u>** देण्यात येते).

**०४.** पोलीसांनी घटनास्थळी छायाचित्रे काढली होती. पोलीसांनी तेथे घटनास्थळाचा नकाशा काढला होता. (साक्षीदारास घटनास्थळ नकाशा दाखविला). त्यावर

माझी सही आहे. (सदर **नकाशास निशाणी ४२** देण्यात येते).

**०५.** माझ्यासोबत त्यावेळी गाडीतून आलेले चोर आज रोजी मला दाखविल्यास मला ओळखता येईल. आज रोजी ते न्यायालयात हजर नाहीत.

**सरतपास पूर्ण.**

**मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास मध्यात्तंराच्या सुट्टी पर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI Date: 2025.07.07 17:46:57 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक ०७.०७.२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

**मध्यात्तंरानंतर उलटतपास शपथेवर, आरोपी क्र. ०१ व ०२ चे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांच्याकडून सुरु –**

**०६.** मी शेती करतो. हे म्हणणे खरे आहे की, माझी देवरुख पोलीसांशी व्यक्तीशः ओळख नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे देवरुख पोलीसांनी मला बोलाविण्याचा व्यक्तीशः संबंध नाही. मी नागोबा देवस्थान समितीचा सदस्य आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी तसा सदस्य असल्याकारणाने पोलीसांनी माझी देवरुख पोलीस ठाण्यात सही घेतली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी आधीच मजकूर लिहून ठेवला होता. त्यावर माझी सही घेतली. मी देवरुख पोलीस ठाण्यामध्ये दोन–तीन सहया केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, सदर सहया करतेवेळी पोलीस ठाण्यामध्ये मी व पोलीस वगळता इतर अन्य कोणी हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला ''तुम्ही देवस्थन समितीचे सदस्य आहात, साक्षीदार आहात, सही करा'' असे म्हणाल्याने मी सही केली होती.

**०७.** हे म्हणणे खरे आहे की, मी सही केलेल्या कागदांवरील मजकूर आज न्यायालयात साक्षीसाठी आल्यानंतर प्रथमतः माझ्या वाचनात आला. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाण्यात माझ्यासमक्ष इतर कोणत्याही व्यक्तीने जबाब दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावर मी सही केल्याची वेळ मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे

की, पवार नावाच्या व्यक्तीचा उल्लेख मी सरतपासात केला होता, त्याचे ओळखपत्र पाहून मी ओळखीविषयी खात्री केली नाही.

०८. पोलीसांनी बोलावल्यानंतर दुपारच्या वेळेत मी घरातून बाहेर पडलो होतो, नेमकी वेळ मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या कोणत्या सहया केल्या त्या दिवशी कोणती तारीख होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी क्र. ०१ व ०२ तर्फे उलटतपास पूर्ण.**

**आरोपी क्र. ०३ तर्फे विधीज्ञ श्रीमती बी. एस. मुरुडकर यांनी आरोपी क्र. ०१ व ०२ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास जशास तसा वाचण्यात यावा अशी तोंडी विनंती केली. विनंती मंजूर.**

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.07.07 17:47:04 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक ०७.०७.२०२५

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 07/07/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 07/07/2025 |
| Evidence uploaded on | :- | 07/07/2025 |